# बोदवड महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना एकका तर्फे पथनाट्य सादरीकरण

(05.09.2019) कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय बोदवड येथे शिक्षक दिनानिमित्त रासेयो स्वयंसेवकांनी पथनाट्य सादर करून उपस्थितांना एका शिक्षकाचे विद्यार्थ्यांच्या जीवनात किती महत्व आहे व आई, वाडीलानंतर शिक्षकच आहे जे आपल्या हितासाठी सदैव कार्यरत असतात व आपल्याला नेहमी अचूक मार्गदर्शन करतात, म्हणून त्यांचे सन्मान करायला पाहिजे असा संदेश पथनाट्याच्या माध्यमातून दिला.

सदर कार्यक्रमाचे महाविद्यालयाचे प्राचार्य व कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राध्यापक अरविंद चौधरी यांनी कौतुक केले. तसेच कार्यक्रमास उपप्राचार्य देवसिंग पाटील, रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ. चेतनकुमार शर्मा, प्रा.कांचन दमाडे, प्रा. नरेंद्र जोशी, डॉ. मनोज निकाळजे, डॉ. विनोद चौधरी, डॉ. गीता पाटील आदी उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वीतेसाठी स्वप्नील, अक्षय, ऋषिकेश, भारती, काजल, शुभांगी, वैशाली, अश्विनी, गायत्री, अंजली, ज्ञानेश्वर आदींनी परिश्रम घेतले





